# बोदवड महाविद्यालयाच्या प्राचार्यपदी प्रा. अरविंद चौधरी रुजू

# प्रामाणिकपणे, मनापासून, निस्वार्थपणे व पारदर्शी काम करेन

**– प्राध्यापक डॉ. अरविंद चौधरी**

प्रामाणिकपणे, मनापासून, निस्वार्थपणे व पारदर्शी काम करेन,माझ्या अनुभवाचा पर्याप्त वापर करेन व महाविद्यालयाचा विकास करेन असे प्रतिपादन दि बोदवड सार्व को–ऑप एज्युकेशन सोसायटी संचलीत कला वाणिज्य व विज्ञान महविद्यालयत प्राचार्य पदाचा कार्यभार स्विकारतांना प्राध्यापक डॉ. अरविंद चौधरी यांनी केले.

दि.२७ डिसेबर २०१७ रोजी संस्थेचे चेअरमन श्री मिठुलालजी अग्रवाल यांचे अध्यक्षतेखाली नुतन प्राचायं पदग्रहण सोहळा संपन्न झाला. या सोहळ्यास संस्थेचे उपाध्यक्ष मा. अजयजी जैन, सचिव मा. विकासजी कोटेचा, जेष्ठ संचालक मा.ॲड.प्रकाशचंद्र सुराणा संचालक मा.श्रीराम बडगुजर, मा.अशोक जैन, मुक्ताईनगर महाविद्यालयचे प्राचार्य डॉ. राजकिशोर गुप्ता माजी प्राचार्य डॉ.ए.पी राजपुत उपप्राचार्य डी.एस. पाटील, सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

या वेळी प्राध्यापक डॉ. अरविंद चौधरी यांनी डॉ.ए.पी राजपुत यांचेकडून प्राचार्य पदाचा कार्यभार स्विकारला.

यावेळी संस्थेचे चेअरमन श्री मिठुलालजी अग्रवाल, संस्थेचे उपाध्यक्ष मा. अजयजी जैन, सचिव मा. विकासजी कोटेचा, जेष्ठ संचालक मा.ॲड.प्रकाशचंद्र सुराणा,मुक्ताईनगर महाविद्यालयचे प्राचार्य डॉ. राजकिशोर गुप्तामाजी प्राचार्य डॉ.ए.पी राजपुत यांनी आपले मनोगत व्यक्त केले व नुतन प्राचार्यांना शुभेच्छा दिल्यात.

नुतन प्राचार्यांचा सत्कार दि.बोदवड सार्व.को.ऑप एज्युकेशन सोसायटी लि. बोदवड यांचे वतीने संस्थेचे चेअरमन श्री मिठुलालजी अग्रवाल यांचे हस्ते करण्यात आला तर प्राध्यापक संघट्नेच्या वतीने डॉ. पी.एस.महाले, शिक्षकेतर कर्मचारी संघटेनेच्या वतीने श्री बाबुराव हिवराळे यांनी सत्कार केला.कार्यक्रमाचे सुत्रसंचलन डॉ. मधकर खराटे यांनी केले तर आभार डॉ. गिता पाटील यांनी मानले.





